महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग
**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,रायगड-अलिबाग**
**हिराकोट तळयाजवळ,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड४०२२०१**
❖दु.क्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्सक्र:०२१४१-२२७४५१❖
❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖

क्रमांक :मशा/जमीन/अ-०३/शा.ज./पर्या.वन/MTHL/२०२२ दिनांक: ०६/०९/२०२२

वाचले:-

१) सह महानगर आयुक्त तथा प्रमुख, भुमि व मिळकत शाखा, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. मुंबई यांचेकडील पत्र क्र.भुवमिशा/एम.टी.एच.एल./वन जमिन/११३७/२०२२, दि.२२/०६/२०२२.
२) तहसिलदार तळा यांचेकडील पत्र क्र.जमीनबाब/कात-४/MTHL/जासई/शा.ज.मागणी/२०२२ दि.२२/०७/२०२२.
३) या कार्यालयाकडील आदेश क्रमांक/ मशा/ जमीन/ अ-०३/ शा.ज./ पर्या.वन MTHL /२०२१, दि.०२/०८/२०२१.
४) उप वनसंरक्षक रोहा यांचेकडील पत्र क्र.ब/२०/जमीन/१५२९/२०२२-२३, दि. ०४/०८/२०२२.
५) या कार्यालयाकडील पत्र क्र.मशा/जमीन/अ-३/४४११७/२०२२, दि.१७/०८/२०२२.
६) उप वनसंरक्षक रोहा यांचेकडील पत्र क्र.ब/२०/जमीन/१७४६/२०२२-२३, दि. ०१/०९/२०२२.
७) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब दि.३१/१२/२०१५मधील नियम ६ पोटनियम (३) (क).
८) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २२ व ३१ तसेच महाराष्ट्र जमिन महसुल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ मधील नियम ५व ६.
९) कार्यालयीन मंजूर टिपणी दिनांक - /०९/२०२२.

---

**आदेश**

उपोद्घातातील अ.क्र. ०१ अन्वये, सह महानगर आयुक्त तथा प्रमुख, भुमि व मिळकत शाखा, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई यांनी शिवडी-न्हावाशेवा जोडरस्ता (MTHL) या प्रकल्पामध्ये रायगड जिल्हयातील मौजे जासई, ता.उरण येथील स.नं.७१/अ/१/ब/१/५/१, ७१/अ/१/ब/१/५/२, ७१/१/ब/१/अ/२, ७१/१/ब/१ब/१, ७१/१/ब/१ब/२, ७१/१/ब/१ब/३, ७१/१/ब/१ब/४, ७१/३ मधील वन जमीनी खालील बाधीत होत असलेल्या २-०८-४७ हे.आर. इतक्या वन दर्जाच्या जमीनीच्या बदली मौजे पिटसई, ता.तळा, जि.रायगड येथील स.नं.१६९ क्षेत्र १६-८०-०० हे.आर. पैकी २-०८-४७ हे.आर. जमिन वन विभागास हस्तांतरीत करणेकामी विनंती केली आहे.

त्यानुषंगाने, उपोद्घातातील अ.क्र.०२ अन्वये, तहसिलदार तळा यांचेमार्फत चौकशी करुन खालील प्रमाणे नमूद जमीन पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित करण्यात आली आहे.

**पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित जमीनीचे वर्णन**

| अ.क्र. | गावाचे व तालुक्याचे नाव | स.नं./हि.नं. | एकूण क्षेत्र (हे.आर.) | मागणी क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|---|
| १ | **मौजे, पिटसई ता.तळा** | १६९ | १६-८०-०० | २-०८-४७ |

उपोद्घातातील अ.क्र.०३ अन्वये, मौजे पिटसई, ता.तळा, जि.रायगड येथील स.नं.१६९ क्षेत्र १६-८०-०० हे.आर. पैकी ११-०२-०० हे.आर. जमीन यापूर्वी MTHL प्रकल्पाकरिता बाधीत होणाऱ्या वन जमिनीचे बदली पर्यायी वनीकरणासाठी वन विभागास अटी व शर्तीवर हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.

वरील प्रस्तावित जमीनीबाबत तहसिलदार तळा यांचेकडील अहवाल व त्यासोबतचे कागदपत्राचे अवलोकन करता खालील प्रमाणे वस्तुस्थिती दिसून येत आहे.

प्रस्तावित जमीनीचा ७/१२ पाहता सदर जमीन सरकारी पड म्हणून दाखल आहे. सदर जमिनीच्या ७/१२ चे इतर हक्कात कोणाचेही नाव नाही. सदर जमीनीमध्ये अतिक्रमण अथवा कोणाचीही वहीवाट नाही. प्रस्तावित जमीन डोंगराळ असून त्यात सुमारे २०-२५ वर्षांची जंगली झाडे आहेत. सदर मिळकतीचे क्षेत्र रेल्वेस्थानक, रेल्वेमार्ग, कारागृह, स्थानिक सार्वजनीक कार्यालय, दफन, स्मशानभूमी किंवा दफनभमी यांचे जवळ येत नाही. सदरची जमीन आदिवासींकडून मिळालेली नाही..सदर जमीनीवर शासकीय/खाजगी संस्थेचा बोजा दाखल नाही. सदरची जमीन पूनर्वसन, भूसंपादन, अगर विकास कार्यासाठी राखून ठेवलेली नाही. कारण तसा अभिलेखी शेरा दिसून येत नाही. सदर जागेपासून ५०० मीटर अंतरावर कोणतीही खाण अथवा स्टोन क्रशर नाही.सदर जमीनीतुन उच्च अगर कमी दाबाच्या विद्युतवाहक तारा जात नाही. सदर जमीनीतुन गटार अथवा पाण्याची पाईप लाईन जात नाही. प्रस्तावित जमीनीचे ५०० मी.आत कांदळवन नाही. प्रस्तावित जमिनीस इनाम (देवस्थान) कायदयाच्या तरतुदी लागू नाहीत. प्रस्तावीत जमिनीस कुळ कायदा कलम ४३, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३६ व ३६अ च्या तरतुदी लागू नाहीत. सदरची जमीन मुळ गावठाणापासून ३ कि.मी. अंतरावर आहे. सदरची जमीन तळा-पिटसई(बोरभाटला अदिवासी वाडी) या रस्त्यापासून ३ कि.मी. अंतरावर आहे. सदर जमीन खाडी पासून १० कि.मी. अंतरावर आहे. प्रस्तावित जमीनीबाबत कोणत्याही संस्थेने अगर इतर कोणीही मागणी प्रस्ताव दाखल केलेला नाही. तसेच सदरची जमीन डोंगराळ उताराची असून जागेमध्ये भरावा करावा लागणार आहे. काही जागा खडकाळ स्वरुपाची आहे. मागणी इतके क्षेत्र उपलब्ध होईल. सदरची जमीन पर्यायी वनीकरणासाठी व लागवडीसाठी योग्य असल्याबाबत वनक्षेत्रपाल माणगांव हे उप वनसंरक्षक रोहा यांचेव्दारे स्वतंत्ररित्या अभिप्राय सादर करणार

आहेत. तरी, तळा तालुक्यातील मौजे पिटसई, ता.तळा, जि.रायगड येथील स.नं.१६९ क्षेत्र १६-८०-०० हे.आर. पैकी २-०८-४७ हे.आर. सरकारी पड जमीन प्रस्तावित पर्यायी वनीकरणाकरिता, वन विभागाच्या अभिप्रायाअंती सदर प्रस्तावित जमीन वन विभागाकडे हस्तांतरीत करण्यास हरकत नसल्याबाबत शिफारस केली आहे.

उपोद्घातातील अ.क्र.०४ अन्वये, उप वनसंरक्षक रोहा यांनी मौजे पिटसई ता.तळा जि.रायगड येथील गट नंबर १६९ क्षेत्र १६-८०-०० हे.आर. पैकी उर्वरित शिल्लक क्षेत्र ५-७८-०० हे.आर. इतके आहे. सदर क्षेत्राची जागेवर जाऊन स्थळपाहणी केली असता नजर अंदाजे सदरची जमिन ही तीव्र उताराची, सर्वसाधारण कातळवट व अंशतः अतिक्रमणित दिसून येते. त्यामुळे सदर क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी व वनव्यवस्थापनासाठी अयोग्य दिसून येत आहे, असे अभिप्राय उपलब्ध करुन देण्यात आलेले होते.

उपोद्घातातील अ.क्र.०५ अन्वये, या कार्यालयामार्फत मौजे पिटसई ता.तळा जि.रायगड येथील गट नंबर १६९ क्षेत्र १६-८०-०० हे.आर. पैकी उर्वरित शिल्लक क्षेत्र ५-७८-०० हे.आर. क्षेत्राची पुनःश्च प्रत्यक्ष स्थळपाहणी करुन त्यापैकी २-०८-४७ हे.आर. क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी वनव्यवस्थापनासाठी व लागवडीसाठी योग्य आहे अगर कसे? याबाबतच फेर अभिप्राय सादर करणेबाबत उपवनसंरक्षक रोहा यांना कळविण्यांत आलेले होते.

त्याअनुषंगाने, उपोद्घातातील अ.क्र.०६ अन्वये, उपवनसंरक्षक रोहा यांनी पुनःश्च प्रत्यक्ष स्थळपाहणी करुन पुढील प्रमाणे अभिप्राय सादर केलेले आहेत. उप अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय तळा यांचे व्दारे दि.२७/०८/२०२२ रोजी मौजे पिटसई, ता.तळा येथील गट नं. १६९ एकूण क्षेत्र १६-८०-०० हे.आर. पैकी यापूर्वी वनविभागास उपलब्ध करुन देणेत आलेले ११-०२-०० हे.आर. क्षेत्राची वनविभागाचे प्रतिनिधी यांचेसमवेत मोजणी करुन हदद् निश्चिती करण्यात आली आहे. वनक्षेत्रपाल माणगांव व सह.वनसंरक्षक (जंकासं व कॅम्पा) रोहा यांनी सादर केलेल्या अहवालानुसार उपवनसंरक्षक रोहा यांनी सहा.वनसंरक्षक (जंकासं व कॅम्पा) रोहा, वनक्षेत्रपाल माणगांव, महसूल विभागाचे प्रतिनिधी, वनपाल तळा व स्टाफ यांचेसह दिनांक ३०/०८/२०२२ रोजी संयुक्त स्थळ पाहणी केली असता, मौजे पिटसई, ता.तळा गट नं.१६९ मधील उर्वरित शिल्लक क्षेत्र ५-७८-०० हे.आर. पैकी आता नव्याने मागणी करण्यात आलेले २-०८-४७ हे.आर. क्षेत्रामध्ये ४०% पेक्षा जास्त घनतेचा नैसर्गिक झाडोरा आहे. त्यामुळे २-०८-४७ हे.आर. क्षेत्रामध्ये नवीन लागवड घेता येणार नाही. तथापि, सदर क्षेत्र वनालगत असल्यामुळे वनव्यवस्थापनेच्या दृष्टीने योग्य असून वनविभागाचे ताब्यात घेण्यायोग्य आहे. तसेच, सदर क्षेत्रास भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ३५ च्या तसेच महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ च्या तरतुदी लागू असल्याचे आढळून येत नाही. सदर क्षेत्र राखीव वन, संरक्षित वन, संपादित वन, अवर्गीकृत वन, पर्यायी वन या संज्ञेत दिसून येत नाही.

उप वनसंरक्षक अलिबाग यांचेकडील पत्र दिनांक १७/०४/२०१६ अन्वये, मुंबई ट्रान्स हर्बर लिंक रोड शिवडी-न्हावा सागरी सेतू (MTHL) अंतर्गत ४७-४१-७० हे.आर. वनक्षेत्र मागणीच्या प्रस्तावास केंद्र शासनाकडील पत्र दिनांक २२/०१/२०१६ अन्वये अटी व शर्तीचे अधिन राहून तत्वतः मंजूरी दिलेली असल्याचे कळविले आहे.

सन २०२२-२३ रोजीचे शिघ्रशिध्द गणकानुसार प्रश्नाधिन जमिनीचे मुल्यांकन रक्कम रु.५,३७,८५३/-(अक्षरी : पाख लाख सदतीस हजार आटशे त्रेपन्न रुपये मात्र) इतके होत आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब दि.३१/१२/२०१५ मधील नियम ६ पोटनियम (३) (क) अन्वये, ज्याठिकाणी केंद्र शासनाने रितसर मान्यता प्रदान केलेल्या शासकीय प्रकल्पांकरिता शासकीय जमिन आवश्यक असेल, व अशी जमीनीची मागणी राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत जिल्हाधिकारी यांचेकडे प्राप्त झाली असेल तेथे अशा जमीनीचे भोगवटामुल्य कितीही असले तरी, राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निश्चित करेल एवढे संबधित जागेचे भोगवटामुल्य वसुल करण्याच्या अधिन राहून जिल्हाधिकारी अशी जमीन केंद्र शासनाच्या संबधित मंत्रालयास प्रदान करण्यास सक्षम राहतील अशी तरतूद आहे.

वरील प्रमाणे वस्तुस्थीती विचारात घेता, मी जिल्हाधिकारी रायगड, मला प्राप्त अधिकारानुसार महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २२ व ३१ व महाराष्ट्र जमिन महसुल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ मधील नियम ५ व ६ तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र चार-ब दिनांक ३१/१२/२०१५ (व्दितीय नियम) नियम २०१५ मधील कलम ३ (क) अन्वये, **मौजे पिटसई ता.तळा येथील गट नंबर १६९ क्षेत्र १६.८०.०० पैकी २-०८-४७ हे.आर**. ही जमीन शिवडी-न्हावाशेवा जोडरस्ता MTHL प्रकल्पामध्ये बाधीत होणाऱ्या वन जमीनीचे बदली पर्यायी वनीकरणासाठी वन विभागास खालील अटी व शर्तीवर हस्तांतरीत करण्याचे आदेश देत आहे.

अटी व शर्ती:-

१) विषयांकीत जमिन महाराष्ट्र शासन, वन विभाग भोगवटादार वर्ग दौन म्हणून धारण करतील.
२) विषयांकीत जमिन पर्यायी वनीकरणासाठी मंजूर करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर जमीनीचा वापर मंजूर प्रयोजना व्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी करता येणार नाही.
३) सदर जमीनीचे मुल्यांकनाची रक्कम रुपये रु.५,३७,८५३/-(अक्षरी : पाख लाख सदतीस हजार आटशे त्रेपन्न रुपये मात्र) इतके होत आहे.सह महानगर आयुक्त तथा प्रमुख, भुमि व मिळकत शाखा, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई यांनी १ महाचे आत शासन जमा करावी.
४) विषयांकीत जमिनीचे शासनाच्या पुर्वपरवानगी शिवाय हस्तांतरण/गहाण/तारण/बक्षिसपत्र किंवा सार्वजनिक खाजगी सहभाग तत्वावर वापर करता येणार नाही. शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय हस्तांतरण/ गहाण/ तारण/बक्षिसपत्र किंवा सार्वजनिक खाजगी सहभाग तत्वावर वापर केल्यास सदर जमिन शासन जमा करण्यात येईल. त्यासाठी कोणतीही नुकसान भरपाई मागता येणार नाही.
५) सदर जमीनीत कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही याची जबाबदारी वन विभागाची राहील.
६) सदर जमीनीची संरक्षण व देखभाल करणेची जबाबदारी वन विभागाची राहील.
७) सदर जमीनीचा ताबा घेतल्यानंतर उप अधिक्षक भूमी अभिलेख तळा यांनी विनाशुल्क मोजणी करुन द्यावी.

८) सदर जमीनीची वन विभागास आवश्यकता नसल्यास ती जमीन पुन्हा महसुल विभागाकडे हस्तांतरीत करावी.

९) वरील अटी शर्ती पैकी कोणत्याही अटी/शर्तीचा भंग झाल्यास प्रश्नाधिन जमिन शासन जमा करण्यांत येईल.

सही /-

(डॉ.महेंद्र कल्याणकर)
**जिल्हाधिकारी रायगड**

प्रत :- सह महानगर आयुक्त तथा प्रमुख, भुमि व मिळकत शाखा, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई यांना माहीती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत :- उप वनसंरक्षक रोहा /अलिबाग यांना माहीतीसाठी व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत :- तहसिलदार तळा यांचेकडे

२/- सदर आदेशा नुसार प्रश्नाधिन जमीनीचा ताबा वन विभागास देण्यात यावा व सदर आदेशानुसार जमिनीबाबत अधिकार अभिलेखात आवश्यक त्या नोंदी घेण्यात येवून सुधारीत ७/१२ उतारा, फेरफार उतारा, ताबा पावतीसह अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा. सदर जमीनीबाबतचा शासन परीपत्रक संकिर्ण-५/२००६/प्र.क्र.४३/ज-१ दिनांक ३१/१०/२००६ अन्वये नोंदणीकृत करारनामा करणेकरीता जिल्हाधिकारी रायगड यांचे वतीने सदर आदेशान्वये, आपणास प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदर नोंदणीकृत करारनामा शासन परीपत्रक ३१/१०/२००६ मधील सुचनांनुसार करावा. सदर करारनामा व सनद तयार करुन या कार्यालयास सादर करावी. तसेच सदर आदेशातील अटी शर्तीचे पालन होते अगर कसे, याबाबत वेळोवळी पाहणी करावी.

प्रत:- उपविभागीय अधिकारी माणगाव यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत:-उपअधिक्षक भुमि अभिलेख तळा यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

४/- सदर आदेशानुसार प्रदान केलेल्या जमीनीची विनाशुल्क पोट हिस्सा मोजणी करुन आकार फोड पत्रक तयार करुन, प्रदान जमीनीचे स्वतंत्र अभिलेख तयार करण्याची पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

प्रत:- मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई-४००६१४ यांना माहितीसाठी सादर.

प्रत:- मा.प्रधान सचिव, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत:- स्थायी आदेश संचिकेसाठी.

(डॉ.महेंद्र कल्याणकर)
जिल्हाधिकारी रायगड